Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{{Bi-Monthly}} Volume – IV, Issue – I June 2015

# अध्ययन शैली

अमरदीप अशोक रामराजे,
सहाय्यक प्राध्यापक,
महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
मालेगाव कॅम्प, नाशिक

मानवाला जी परिस्थिती प्राप्त होते किंवा ज्या परिस्थितीत तो वावरत असतो त्यातून मिळणारे औपचारिक /अनौपचारिक शिक्षण हे तो आजीवन ग्रहन करत असतो. आज ज्ञानाच्या क्षेत्रात मोठया प्रमाणात प्रगती झालेली दिसते आहे. तसेच जगाची प्रगतीच्या दिशेने होणारी वाटचालीने मोठा वेग घेतला आहे. आज प्राप्त केलेले ज्ञान उद्या मागे पडतांना दिसत आहे या बदलत्या काळाशी तसेच वेगाशी मानवाने समन्वय साधायला हवा.

वरील आशयाचा विचार केल्यास एक म्हण लक्षात येते की जो थांबला तो संपला कारण बदलत्या काळानुसार व्यक्तीने ज्ञान ग्रहन केले नाही किंवा शिक्षण घेतले नाही तर तो जगाच्या पाठीवरचे आपले अस्तित्व अंधारात नेईल यासाठी बदलत्या काळानुसार शिक्षण घेणे, ज्ञान ग्रहण करणे आवश्यक आहे त्यासाठी मानवाने आजन्म शिकत असणे आवश्यक आहे शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षणाद्वारे मुलांच्या सुप्त गुणांना वाव दिला जातो. शिक्षणाद्वारे शिक्षक विद्यार्थ्यांना ज्ञानात्मक व संस्कारात्मक गोष्टी देण्याचा प्रयत्न करत असतो. तसेच नैतीक मूल्यांद्वारे विद्यार्थ्यांच्या अंगिभूत असणा–या विघातक प्रवृत्तींना आळा घालण्याचे काम शिक्षक करत असतो विविध उपक्रमांद्वारे सामाधानकारक गोष्टी विद्यार्थ्यांच्या अंगी रुजवण्याचा शिक्षक प्रयत्न करत असतो. पण शिक्षक विद्यार्थ्यांना ज्या गोष्टी देत असतो त्या गोष्टींचे ग्रहण विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे करणे आवश्यक आहे म्हणजे त्यांचे अध्ययन योग्य पध्दतीने होणे आवश्यक आहे.

अध्ययन म्हणजे काय ? ते पुढीलप्रमाणे .:–

१. **गेटस्** : अध्ययन म्हणजे अनुभवाद्वारे वर्तनात बदल घडवून आणणे.

२. **एफ.एच.रच.** : व्यक्तीचा परिसराशी येणा–या संबंधांमुळे तिच्या प्रतिक्रिया देण्याच्या पध्दतीत होणारे बदल म्हणजे अध्ययन.

३. **को अॅड को** : अध्ययन म्हणजे ज्ञान, सवयी व वृत्ती यांचे संपादन.

४. **गॅरेट** : नव्या परिस्थितीला प्रतिसाद देण्याचे आयोजन ज्या कृतीमुळे आपण करु शकतो ती कृती म्हणजे अध्ययन होय.

५. **Murphy :** Learning is the modification in both behaviour and the way of preceiving.

६. **Crow and Crow :** Learning involves the acquisition of habits, knowledge and attitudes.

वर्गात अनेक प्रकारची मुले असतात. त्यांची बौध्दिक, शारीरिक, माणसिक क्षमता वेगवेगळया असतात. तसेच त्यांची कौटुंबीक व सामाजीक पार्श्वभूमी वेगवेगळी असते याचा परीणाम बालकाच्या अध्ययनावर होत असतो त्यामुळे त्यांची शिकण्याची पध्दत ही वेगवेगळी असते कारण या शिकण्याच्या शैलीनुसार त्यांना अध्यापन केले तर निश्‍चितच त्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर सकारात्मक होईल. अध्ययन शैली हा असा दृष्टीकोण आहे की ज्या विद्यार्थ्यांच्या विविध गरजा आहेत त्यांना अध्ययन करणे सोपे जावे म्हणून त्यांना आवडेल अशा पध्दतीने अध्ययनात विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी अध्यापक वापर करु शकेल. विद्यार्थी आपल्या पसंतीनुसार शिकतात साहाजीकच त्यांचे अध्ययन चांगले होते व त्यांना शिकण्याचा आनंद मिळतो , त्यांच्या ज्ञानात भर पडते व मिळवलेली माहिती दिर्घकाळ त्याच्या स्मरणात राहते.

**अध्ययन शैली.**

१. **स्मिथ** : अध्ययनशैली म्हणजे अभ्यासातून किंवा अनुभवांतून ज्ञान कौशल्य आणि वृत्ती प्राप्त करण्याची वैशिष्टयेपूर्ण सवय.

२. **लेकॉक** : अध्ययन कर्त्याचे असे वैशिष्टये की कोणत्याही अनुदेशन परिस्थितीत तो विशिष्ट प्रतिसाद देतो.

३. **सिगल आणि कुप** : अध्ययनशैली ही अशी एकात्मिक संकल्पना आहे की ज्यातून व्यक्तिमत्व आणि बोधात्मक रचनेची जोडणी केली जाते.

अध्ययनशैली म्हणजे व्यक्ती आपले अध्ययन करतांना भोवतालच्या भौतिक, सामाजिक, भावनिक, पर्यावरणाचा एकत्रित विचार करुन ज्ञान, कौशल्ये, अभिवृत्तीची प्राप्ती करते.

विविध तज्ज्ञांनी अध्ययनशैली नुसार अध्ययनार्थीचे गट सांगितले आहेत.

**मनु.पी यांनी अध्ययनशैली नुसार अध्ययनार्थींचे चार गट सांगितले आहेत.**

- नावीन्यपूर्ण अध्ययनार्थी
- विश्लेषणात्मक अध्ययनार्थी
- सर्वसामान्य अध्ययनार्थी
- वैविध्यपूर्ण अध्ययनार्थी

- **नाविण्यपूर्ण अध्ययनार्थी**

१. या मध्ये विद्यार्थ्याला कोणतीही नवीन गोष्ट शिकायची असल्यास त्यामागचे कारण हवे असते

२. तो अर्थाचा शोध घेण्याचा प्रयत्न करत असतो.

३. त्याची कल्पना करण्याची शक्ती उच्च प्रतीची असते.

४. तो विचार विविध मार्गानी करत असतो एकच मार्ग अवलंबत नाही.

५. तो जी पण माहीती प्राप्त करत असतो ती मुर्त स्वरुपात प्राप्त करत असतो.

६. त्याला इतरांबरोबर काम करायला आवडते.

- **विश्लेषणात्मक अध्ययनार्थी**

१. हे विद्यार्थी तथ्य समजावून घेण्यासाठी उत्सुक असतात.

२. हे माहिती अमुर्त स्वरुपात स्विकारतात व तीचे विश्लेषण करतात.

३. हे विद्यार्थी स्वत: संकल्पना निर्माण करतात.

४. यांना माहिती जमवतांना व एकत्र करतांना आनंद मिळत असतो.

५. यांना क्रमबध्द पध्दतीने विचार करायला आवडते.

- **सर्वसामान्य अध्ययनार्थी**

१. यांना कोणत्याही कार्याची माहिती प्रत्यक्ष अनुभवातून घ्यायला आवडते.

२. परिस्थिती व घटनां याच्या उपयुक्ततेची विषयी ते निरीक्षण करतात.

३. प्रश्न सोडवणे त्यांना आवडते.

४. कल्पनांच्या उपयुक्ततेवर ते जास्त विचार करतात.

- **वैविध्यपूर्ण अध्ययनार्थी**

१. यांच्यात नियोजनप्रमाणे टीकवूण राहण्याची क्षमता असते.

२. हे विद्यार्थी जबाबदारी स्वीकारत असतात.

३. बदलत्या परिस्थितीचा ते आस्वाद घेत असतात.

४. ते विविध कृतींचा शोध घेत असतात.

५. माहिती मूर्त स्वरुपात मिळवतात व कृतीयुक्त प्रक्रिया करतात.

**डेव्हीड कोल्ब यांनी अध्ययनशैली नुसार अध्ययनार्थीचे चार गट सांगितले आहेत.**

- आत्मसात करणारे अध्ययनार्थी
- केंद्राकडे वळणारे अध्ययनार्थी
- सामावून घेणारे अध्ययनार्थी
- बहुदिश विचार करणारे अध्ययनार्थी

- आत्मसात करणारे अध्ययनार्थी

१. हे विद्यार्थी एकटेच विचार करतात.

२. कोणत्याही गोष्टीचा बारकाईने खोलवर विचार करतात.

३. नवीन ज्ञानाचा जुन्या ज्ञानाशी सबंध जोडुण बघतात.

४. विज्ञानामध्ये ( वैज्ञानीक दष्टीकोण ) व गणितात अधिक रस घेतात.

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{{Bi-Monthly}} Volume – IV, Issue – I June 2015

५. सिध्दांत मांडण्याची क्षमता असते.

● केंद्राकडे वळणारे अध्ययनार्थी

१. मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग कुठे करता येईल याचा विचार करतात.

२. नियोजनाद्वारे कामे करतात.

३. व्यक्ती व भावनांमध्ये त्यांना रस नसतो.

४. ज्ञानाचा प्रत्यक्ष उपयोग करुन पाहणे त्यांना आवडते.

५. हे स्वनिर्देशित अध्ययनार्थी असतात.

६. हे वस्तुंमध्ये अधिक रमतात.

७. कौशल्यपूर्ण कामे करतात.

● सामावून घेणारे अध्ययनार्थी

१. कोणतीही गोष्ट चटकण स्विकारतात.

२. यांना नवीन गोष्टी करायला आवडतात.

३. जोखीम घ्यायला आवडते.

४. हे इतरांची मदत घेतात.

५. अंत:प्रेरणेने प्रश्न सोडवतात.

६. नियोजन, वेळेची आवड नसल्याने अचानक कामे स्विकारतात.

● बहुदिश विचार करणारे अध्ययनार्थी

१. हे विद्यार्थी कल्पक असतात.


२. एकाच गोष्टीकडे अनेक दृष्टीकोणातून बघतात.

३. अनेक गोष्टींमध्ये आवड असते.

४. स्वअनुभवातून माहिती मिळवतात.

५. यांना नियोजनानूसार काम करायला आवडत नाही.

**अध्ययनशैलीचे विविध प्रकार**



IIJS Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{{Bi-Monthly}} Volume – IV, Issue – I June 2015

- दृक अध्ययनशैली

दृक अध्ययन शैली म्हणजे कोणतीही गोष्ट किंवा माहिती लक्षात ठेवण्यासाठी विद्यार्थी त्या माहितीचे चित्रात रुपांतर करतो व लक्षात ठेवतो. कोणतीही गोष्ट करण्यासाठी ती गोंष्ट अगोदर एखादी व्यक्ती दाखवते त्यानंतर विद्यार्थी त्या व्यक्तीबरोबर ते काम चांगल्या प्रकारे करते. या विद्यार्थ्यांना प्रवासात नकाशा वाचनामुळे फायदा होतो कारण कोणत्याही ठीकाणाची माहितीचे त्यांना त्याद्वारे आकलन होते. चित्रातून व लेखनातून त्यांना आनंद प्राप्त होत असतो. कृतीतून शिकवलेल्या गोष्टी त्यांना चांगल्या प्रकारे समजतात व त्यांच्या त्या दिर्घकाळ लक्षात राहतात. हाताने त्यांना काम करायला आवडते. जेव्हा शिक्षक एखादी वस्तू किंवा प्रयोग प्रत्यक्ष मूर्त स्वरुपात दाखवतात तेंव्हा त्यांना ते आवडते. चित्ररुपाने नविण माहिती ते पटकन ग्रहण करतात.

- **श्राव्य अध्ययनशैली**

या अध्ययनशैलीमध्ये विद्यार्थ्यांना शाब्दिक माहिती दिली असता ती त्यांना चांगल्या प्रकारे समजते. वर्गात शिक्षकाणे सांगितलेली माहिती ऐकूण त्यांच्या ती लक्षात राहते . यांना दुस—यांच्या कल्पना , विचार ऐकायला आवडतात व त्यावर स्वत:चे मत मांडायला आवडते. हे विद्यार्थी दोन आवजातील साम्य भेद ओळखू शकतात. गटात काम करतांना इतरांच्या कल्पना ऐकूण त्यावर मत मांडतात. तोंडी सूचनांचे हे पालन करतात. त्यांना गोष्ट ऐकायला आवडते. स्वत:शी , इतरांशी बोलणे व गाणे म्हणायला त्यांना आवडते.

- **स्पर्श संवेदन / कारक अध्ययनशैली**

या विद्यार्थ्यांना कृतीयुक्त सहभाग आवडतो कोणतेही काम यांना कृती करुन पूर्ण करायला आवडते. यांची कारक कौशल्य विकसित होतात. अशा विद्यार्थ्यांना प्रकल्प , भूमिका पालन, कृतींयुक्त काम , शोधन पध्दतीचा फायदा होतो. हे विद्यार्थी कोणतेही काम करतांना सर्व ज्ञानेंद्रीये व हातांचा कृतीसाठी वापर करतात.

**वरील विविध अध्ययन शैलींमध्ये शिक्षकाची भूमिका :—**

१. जे विद्यार्थी आत्मसात अध्ययन करतात त्यांना शिक्षकांने कार्य करण्यास वेळ द्यावा.
२. केंद्राकडे वळणा—या विद्यार्थ्यांना शिक्षकाने क्रमान्वित, सुरचित अशा प्रकारचे मार्गदर्शन करावे.
३. सामावून घेणा—या विद्यार्थ्यांना कुतीयुक्त/प्रायोगिक पध्दतीने शिकवावे.
४. बहुदिश विचार करणा—या विद्यार्थ्यांना गटकार्य करण्यास वेळ व त्यांच्या सृजनशिलतेस वाव द्यावा.
५. सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या अध्ययनशैलींची जाणीव करुन द्यावी.
६. अध्ययन विद्यार्थ्यांच्या अनुभवाशी संबंधित असे असावे त्यानुसार शिक्षकाणे अध्यापन करावे.
७. सराव करायला पुरेसा वेळ द्यावा.
८. शिक्षकाणे विद्यार्थ्याना अध्ययन—अध्यापन प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रेरणा द्यावी.

९. शिक्षकाणे विद्यार्थ्यांना विचार मांडण्यास व विचार करण्यास संधी द्यावी.

१०. शिक्षकाणे विद्यार्थ्यांना तात्काळ प्रत्याभरण द्यावे.

११. शिक्षकाणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

**संदर्भ सूची :**


१. डॉ. संजीवनी राजेश महाले ( २००५) अध्यापन प्रतिमाने आणि अध्ययन शैली. युनिक पब्लिकेशन, औरंगाबाद

२. डॉ.रामदास बरकले डॉ.नलिनी पिचड ( २०१०) शैक्षणिक मानसशास्त्र. इनसाईट पब्लिकेशन, नाशिक

३. https://en.wikipedia.org/wiki/Learning_styles

४ http://blc.uc.iupui.edu/Academic-Enrichment/Learning-Styles/3-Learning-Styles

५. http://www.cvcc.edu/Resources/Learning_Assistance_Center/pdf/Learning_Styles1.pdf